महाराष्ट्र शासन

क्रमांक: एनजीसी-३५९२/५०४७/विशि-२.
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १०/८/९२

प्रति,

कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव.

विषय :- सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांची नवीन महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्याबाबत..

महोदय,

सन १९९२-९३ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करून आदिवासी सातपुडा शिक्षण संस्था प्रसारक मंडळ, धुळे या संस्थेला १९९२-९३ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर [illegible]/विद्यापीठ अधिनियम १९८९ च्या कलम ५३[४] व [६] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण. | विद्याशाखेचे महाविद्यालय. |
|---|---|
| धडगांव, ता. अक्राणी, जि. धुळे, | कला. |

२ शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे. :-

१] सदर महाविद्यालयास सध्या विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली आहे. शासन निर्णय, क्र. एनजीसी-२०८८/[१६५२]/विशि-२[अ], दिनांक ४. १. १९८९ अन्वये लागू करण्यात आलेल्या सूत्रानुसार या महाविद्यालयाला अनुदानसंहिता तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यात येईल.

२] ज्या विद्याशाखा उघडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग १९९२-९३ पासून सुरू करावा. तसेच १९९२-९३ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी ५० विद्यार्थी असले पाहिजेत.

(2)

२..

३.             स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यानंतर कलम ५३[७] व [८] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

४.             संबंधित संस्थेस महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी देताना त्या संस्थेस विद्यापीठाने असे कळवावे की, प्रवेश संख्या तात्पुरत्या स्वरुपात देऊन जर ६० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरु करावेत. महाविद्यालयात पुढे देण्यात येणारे संलग्नीकरण ही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील. अन्यथा महाविद्यालयांना संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ५३[७] व [८] अनुसार संलग्नीकरणाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे पाठविताना ही अट पूर्ण झाली किंवा नाही याबद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ शरद परब ]

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रशासन अधिकारी [उच्च शिक्षण अनुदान], नाशिक विभाग, नाशिक.
सचिव, आदिवासी सातपुडा शिक्षण संस्था प्रसारक मंडळ, धुळे.

२.             महाविद्यालय सुरु करण्याच्या संदर्भात विद्यापीठ अधिनियमानुसार मुख्य विद्यापीठाशी संपर्क साधावा.

शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव,
निवड नस्ती, विशि-२, विशि-२[अ].

तोंडलकर ८.८